**प्रतिवादी यांचा साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री डी.टी.पाटील यांच्यामार्फत सुरु.**

मला वडीलोपार्जीत मिळकत आहे. ती मिळकत गट क्र. ९८ मध्ये आहे व ती माझे नावाने आहे. चंद्रशेखर यांच्या नावाने मिळकत गट क्र.३२४ आहे. गट क्र. ३२४ आम्ही जन्मलो नव्हतो त्यावेळी घेतली आहे. गट क्र. ३२४ मधील जमीन बापूराव, शिवाजीराव व चंद्रशेखर यांच्या नावाने घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३२४ मधील चंद्रशेखर आणि बापूसाहेब यांच्या जमीनीच्य उत्तरेला गट क्र. ३३७ मधील वादी यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. ३३७ व गट क्र. ३२३ चा सर्वे नंबर एकच होता. गट क्र. ३२४ मध्ये बैनामा एकच झाला होता. तो बैनामा शिवाजीराव यांच्या नावे झाला होता व त्याचे क्षेत्र साडे चार एकर एवढे होते. ती जमीन देशमुख यांच्याकडून खरेदी करण्यात आली होती.

ती देशमुख यांची जमीन इनामी किंवा कुळाची नव्हती. त्या जमीनीचा शिवाजीराव यांनी मोजून ताबा घेतला होता. हे मला माहीत नाही की, ती मोजणी कधी व कोणत्या कार्यालयातून करण्यात आली होती. त्याचे दसत मी दाखल करु शकतो. देशमुख यांनी आमच्या खरेदीखताच्या अगोदर कुर्ले, साके व चामलवाड यांना जमीन विकली होती. आमच्या जमीनीच्या पश्चीमेला साके यांची जमीन आहे. ती जमीन नदीच्या पश्चीमेला आहे. आमच्या जमीनीच्या दक्षीणेला चामलवाड यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रदीप पाटील व आमच्या जमीनीच्या मध्ये पुर्व पश्चीम असा बांध होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो आताही आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो बांध वादग्रस्त आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तो बांध फोडून गट क्र. ३३७ मध्ये बांधाच्या उत्तरेकडून १२ गुंठयाचे अतिक्रमण केले आहे.

प्रदिप पाटील यांनी जमीन मोजून घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे

की, प्रदीप पाटील व माझेमध्ये गट क्र. ३३७ मधील १२ गुंठयाबाबत वाद आहे. माझी ही ईच्छा आहे की, प्रदीप पाटील यांच्या गट क्र. ३३७ व माझे जमीनीची मोजणी करुन हद्दीखुणा कराव्यात.

प्रश्न- तसा तुम्ही अर्ज देऊ शकता का ?

उ. होय, प्रदीप पाटील यांनी दिला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, प्रदीप पाटील यांची गट क्र. ३३७ मधील १२ गुंठे जमीन माझे ताब्यात असल्यामुळे मी मोजणीचा अर्ज देत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अंदाजे १२ गुंठे ताब्यात आहे असे ते म्हणतात असे मी खोटे कथन करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी केल्या शिवाय गट क्र. ३३७ मधील माझे ताब्यात किती जमीन आहे हे लक्षात येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे तात्यात गट क्र. ३३७ मधील १२ गुंठे जमीन आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, एक गुंठा देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.03.30 12:44:01 +0530

( व्ही. एस. वाघमोडे )

दि. ३०/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर